# प्रेसनोट

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अकोला
दिनांक:— १४/०९/२०२५

| | | |
|---|---|---|
| १ | युनिट चे नाव | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अकोला घटक |
| २ | आरोपीचे नाव, हुद्दा व कार्यालयाचा पत्ता | आरोपी श्री. हेमंत भागवत पाटील, वय ४४ वर्ष, पद— तहसिलदार, तहसिल कार्यालय, मोताळा ता. मोताळा जि. बुलढाणा,वर्ग—१, रा. भराडी ता. जामनेर जि. जळगांव ह.मु.श्री. समाधान जाधव यांचे घरी भाड्याने, रामलक्ष्मी नगर, गायकवाड ले—आऊट, क्रिडा संकुल रोड, बुलढाणा ता.जि. बुलढाणा |
| ३ | घटना तारीख वेळ | दिनांक १४.०९.२०२५ चे १३.३८ ते १४.१५ वा. |
| ४ | मागणी केलेली लाच रक्कम | रू. २,००,०००/— |
| ५ | स्विकारलेली लाच रक्कम | रू. २,००,०००/— |
| ६ | घटनास्थळ | आरोपीचे राहते घर व्दारा—श्री. समाधान फकीरबा जाधव यांचे राहते घर, रामलक्ष्मी नगर, गायकवाड ले—आऊट, क्रिडा संकुल रोड, बुलढाणा ता.जि. बुलढाणा |

थोडक्यात हकिगत :— यातील तक्रारदाराचे मामा यांचे नांवे ग्राम थड येथील गट नंबर २३ मधील ०१.६२ हे.आर. ही शेतजमीन तक्रारदारास विकत असल्याबाबत नोंदणीकृत सौदेपत्रक करून दिलेले आहे. सदर जमीन ही भोगवटादार वर्ग—२ मधुन वर्ग—१ करण्याकरीता तक्रारदाराचे मामा यांनी तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, मोताळा जि. बुलढाणा यांना आवश्यक सर्व कागदपत्रांसह अर्ज सादर केलेला आहे. तक्रारदाराचे मामा अशिक्षीत असल्यामुळे सदरची शेतजमीन भोगवटादार वर्ग—२ मधुन वर्ग—१ मध्ये करण्यासंबंधाने तक्रारदार हे श्री. हेमंत पाटील, तहसिलदार, मोताळा यांना भेटले असता, त्यांनी सदर जमीनीचे भोगवटादार वर्ग—२ मधुन वर्ग—१ मध्ये करण्याकरीता प्रति एक्कर रू. ५०,०००/— याप्रमाणे एकुण ४ एक्कराचे रू. २,००,०००/— ची मागणी केली. परंतु तक्रारदारास श्री. हेमंत पाटील, तहसिलदार यांनी मागणी केलेली लाच रक्कम देण्याची मुळीच इच्छा नसल्याने त्यांनी आरोपी श्री. हेमंत पाटील, तहसिलदार यांचेविरूध्द कार्यवाही करण्याकरीता ला.प्र.वि. अकोला घटकाकडे दिनांक ०३.०९.२०२५ रोजी तक्रार नोंदविली.

सदर तक्रारीवरुन दिनांक १३.०९.२०२५ रोजी आरोपी यांचे राहते घर रामलक्ष्मी नगर, गायकवाड ले—आऊट बुलढाणा ता.जि. बुलढाणा येथे लाच मागणी पडताळणी करण्यात आली. सदर लाच मागणी पडताळणी कार्यवाही दरम्यान आरोपी श्री. हेमंत पाटील, तहसिलदार यांनी सदरची शेतजमीन भोगवटादार वर्ग—२ मधुन वर्ग—१ मध्ये करण्याकरीता तक्रारदाराकडे पंचासमक्ष रू. ५०,०००/— प्रति एक्कर प्रमाणे एकुण ४ एकराचे रू. २,००,०००/— लाच रकमेची मागणी केली.

त्यानंतर आज दिनांक १४.०९.२०२५ रोजी आरोपी यांचे राहते घर रामलक्ष्मी नगर, गायकवाड ले—आऊट बुलढाणा ता. जि. बुलढाणा येथे रचण्यात आलेल्या यशस्वी सापळा कार्यवाही दरम्यान आरोपी श्री. हेमंत पाटील, तहसिलदार यांनी तक्रारदाराकडे मागणी केलेली लाच रक्कम रू. २,००,०००/— पंचासमक्ष स्विकारली. त्यानंतर आरोपीस संशय आल्याने आरोपीने सदरची लाच रक्कम त्याचे राहते घराच्या शौचालयामध्ये टाकून दिले व लाच रक्कम (पुरावा) नष्ट करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर सदरची लाच रक्कम रू. २,००,०००/— दोन्ही पंचासमक्ष जप्त करण्यात आली. त्यावरून नमुद आरोपी विरूध्द पोलीस स्टेशन बुलढाणा (शहर) जि. बुलढाणा येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कार्यवाही मा. श्री. मारुती जगताप, पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती (९८५०४८८७८८), मा. श्री. सचिंद्र शिंदे, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती (९७६४२१०४८५), श्री. मिलिंदकुमार बहाकर, पोलीस उपअधिक्षक, लाप्रवि. अकोला (९१५८८२२६७६) यांचे मार्गदर्शनात सापळा अधिकारी श्री. अतुल इंगोले, पोलीस निरीक्षक (८८८८७५७५५०), पोलीस अंमलदार दिगांबर जाधव, अविनाश पाचपोर, गोपाल किरडे, संदिप ताले, असलम शहा, निलेश शेगोकार, मपोहवा. अर्चना घोडेस्वार, चालक नफिस सर्व ला.प्र.वि. अकोला यांनी पार पाडली.

तरी सर्व नागरीकांना आव्हान करण्यात येते की, कोणत्याही शासकीय अधिकारी/कर्मचारी अथवा त्यांच्यावतीने कोणत्याही खाजगी इसमाने त्यांचे कोणतही शासकीय काम करून देण्यासाठी लाचेची मागणी केल्यास तात्काळ अॅन्टी करप्शन ब्युरो, अकोला येथील खालील क्रमांवर संपर्क साधावा.

ऑफिस फोन नं. ०७२४—२४१५३७०, टोल फ्री क्रमांक १०६४
मोबाईल क्र. ९४०३८०१०६४

(मिलींदकुमार अ. बहाकर)
पोलीस उपअधीक्षक,
लाचलचपत प्रतिबंधक विभाग, अकोला